सकाळ

नगर, २५ जुलै २०१३

कुरुंद (ता. पारनेर) : जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. उदय शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त संजीवनी महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. त्या वेळी आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपट पवार, ॲड. उदय शेळके, प्राचार्य सुनील कापसे.

युवा पिढीने वृक्षलागवडीवर भर द्यावा : पोपट पवार

निघोज, ता. २४ : पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याने मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. यावर वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन करणे काळाजी गरज आहे. युवा पिढीने वृक्षलागवडीवर भर द्यावा, असे आवाहन आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपट पवार यांनी केले.

जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष ॲड. उदय शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त कुरुंद (ता. पारनेर) येथील संजीवनी महाविद्यालयात आज वृक्षारोपण, रांगोळी स्पर्धा व रक्तदान शिबिर झाले. या उपक्रमांचे उद्घाटन पवार यांच्या हस्ते झाले. त्या वेळी झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. संजीवनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. उदय शेळके, प्राचार्य एस. डी. कापसे, प्रा. शिवाजी शेटे, नारायण बोरुडे, संतोष लावंड, एस. एस. पवार, गोपीनाथ ढुबे, जे. जी. खोसे, संपत ढुबे आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी ॲड. शेळके यांचे अभीष्टचिंतन पवार यांच्या हस्ते करण्यात आले.

पुढारी

नगर, २५ डिसेंबर २०१३

प्राध्यापक प्रशिक्षणास 'संजीवनी'ला मान्यता

पारनेर : प्रतिनिधी

तालुक्यातील कुरूंद येथील संजीवनी प्रतिष्ठान संचलित इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड पॉलिटेक्निक या महाविद्यालयास राज्य तंत्रशिक्षण मंडळाने प्राध्यापकांच्या प्रशिक्षणास मान्यता दिली आहे, अशी माहिती प्राचार्य सुनील कापसे यांनी दिली.

यासंदर्भात प्राचार्य कापसे म्हणाले की, नवी दिल्लीच्या ए आयसीटीई मान्यताप्राप्त पदविका अभियांत्रिकी चौथ्या सत्राचा अभ्यासक्रम मुंबईच्या एम एसबीटीईने बदलला आहे. त्यासाठी राज्यातील निवडक महाविद्यालयांची प्राध्यापकांच्या प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. कुरूंदच्या महाविद्यालयात नगर, जालना व बीड या जिल्ह्यांतील पॉलिटेक्निक महाविद्यालयातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील सर्व प्राध्यापकांसाठी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रशिक्षणाचे निमंत्रण सर्व महाविद्यालयांना ई-मेलद्वारे पाठविण्यात येणार आहे. संबंधित प्राध्यापकांनी या प्रशिक्षणास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कापसे यांनी केले आहे. संजीवनी महाविद्यालयातून प्रा. भाऊसाहेब अनारसे, प्रा. संदीप जाधव, प्रा. विजय जाधव, प्रा. नवनाथ भिसे, प्रा. विक्रांत मल्लाव, प्रा. प्रमोद भोस, प्रा. रवींद्र गिते यांची निवड करण्यात आली आहे. संजीवनी महाविद्यालयास या प्रशिक्षणाची संधी दिल्याबद्दल महानगर बँकेचे अध्यक्ष गुलाबराव शेळके, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष तसेच संजिवनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष उदय शेळके यांनी धन्यावाद दिले.

देशदुत

नगर, १५ जुन २०१३

संजीवनी प्रतिष्ठानच्या महाविद्यालयाचे यश

निघोज, दि. १४ – महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत कुरूंद (ता. पारनेर) येथील संजीवनी प्रतिष्ठान या महाविद्यालयाच्या पॉलीटेक्नीक शाखेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले. इलेक्टॉनिक्स अँड टेली इंजिनिअरिंग तृतीय वर्षातील श्रीकांत सुरेश जाधव याने ८४.१२ टक्के गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. सिव्हील इंजिनिअरिंग विभागातील द्वितीय वर्षातील परेश मारुती भोईर याने ८१.३३ टक्के गुण मिळवुन प्रथम व कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागात द्वितीय वर्षाची छाया मारुती पठारे हिने ८१.९४ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळविला. मॅकॅनिकलमध्ये शिवाजी जालिंदर शेळके (७८.४२) प्रथम आला. तृतीय वर्ष मॅकेनिकल, सिव्हील, इलेक्ट्रॉनिक अँड टेली इंजिनिअरिंगचा निकाल १०० टक्के लागला असून कॉम्प्युटर इंजिनिअरिंगचा निकाल ९२ टक्के लागला आहे. प्रथम वर्षातील नारायण भाऊसाहेब बोंगाने (मॅकेनिकल), राहील रियाज खान (इलेक्ट्रॉनिक अँड टेली.), गायत्री विकास दळवी (कॉम्प्युटर), द्वितीय वर्षातील दत्तात्रय करंजुले (मॅकेनिकल), सोमनाथ बळीराम सागर (इलेक्ट्रॉनिक अँड टेली.), तृतीय वर्षातील प्रमोद सुरेश गायकवाड (सिव्हील), स्वाती दादाभाऊ भालेकर (कॉम्प्युटर) या गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या वर्गामध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. या विद्यार्थ्यांचा नुकताच संस्थेचे अध्यक्ष ॲड. उदयराव शेळके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सकाळ

नगर, २० मार्च २०१३

दहावी-बारावीनंतर तांत्रिक क्षेत्रातील करिअरच्या संधी

आजच्या स्पर्धेच्या युगात प्रत्येक पालकाला आपल्या पाल्याच्या भविष्याची चिंता असणे स्वाभाविक आहे. पाल्याने चांगले नाव कमवावे, स्वावलंबी व्हावे, समाजात प्रतिष्ठा मिळवावी, असे सर्वांचे स्वप्न असते. शैक्षणिक कारकिर्दीत दहावी-बारावीनंतर घेतलेला निर्णय पुढील प्रत्येक टप्प्यावर महत्त्वाचा ठरतो; परंतु दहावी-बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे पालक आपल्या पाल्याने कोणत्या अभ्यासक्रमास प्रवेश घ्यावा, याबाबत संभ्रमावस्थेत असतात. पाल्याचा कल व त्याला विश्वासात घेऊन निर्णय घेतल्यास स्वप्नपूर्ती ही निश्चितच असते.

पाल्यावर आपली मते थोपविण्यापेक्षा त्याला त्याचा कल व आवडीप्रमाणे संधी उपलब्ध करून देणे हे प्रत्येक पालकाचे कर्तव्य आहे. आजसुद्धा बरीच क्षेत्रे अशी आहेत की ज्या ठिकाणी भरपूर नोकऱ्या व व्यवसाय उपलब्ध आहेत; परंतु त्यासाठी आपल्याकडे प्रशिक्षित व नैपुण्य असलेले मनुष्यबळ उपलब्ध नाही.

दहावीनंतर आयटीआय, डी. एड., पॉलिटेक्निक, इतर व्यावसायिक कोर्सेस विद्यार्थ्यांना करता येतात. पदविका अभ्यासक्रम (पॉलिटेक्निक) हा तीन वर्षांचा व्यावसायिक अभ्यासक्रम असून, त्यामध्ये विविध तांत्रिक कोर्सेस उपलब्ध आहेत. दहावी पास-बारावी नापास विद्यार्थी पॉलिटेक्निक कोर्सच्या प्रथम वर्षास पात्र असतात. सदर कोर्स पूर्ण झाल्यानंतर विविध सहकारी, सरकारी, खासगी क्षेत्रांत नोकरीच्या, तसेच व्यवसायाच्या भरपूर संधी यानंतर उपलब्ध आहेत. तसेच, कोर्स पूर्ण केल्यानंतर पदवी अभियांत्रिकीच्या द्वितीय वर्षात प्रवेशास विद्यार्थी पात्र असतात. त्याद्वारे उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध असते.

बारावीनंतर एम.बी.बी.एस., बी.एच.एम.एस., बी.ए.एम.एस. यासारखे मेडिकल कोर्सेस व अभियांत्रिकी, तसेच आर्टस, कॉमर्स सायन्स इ. क्षेत्र विद्यार्थ्यांना खुले असतात. यामध्ये प्रवेश घेताना पालकांनी विद्यार्थ्यांचा कल, क्षमता व आवड विचारात घेणे आवश्यक असते. साधारणतः पाच वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे साहजिकच विद्यार्थी व पालकांचा ओढा पुण्या-मुंबईकडे असायचा; परंतु सध्या महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व जिल्ह्यांमध्ये मेडिकल, इंजिनिअरिंग, आर्टस, कॉमर्स, सायन्स, डी. एड., बी. एड. इत्यादी उच्च प्रतीचे शिक्षण उपलब्ध झाले आहे. त्यामुळे शहरांमध्ये जाऊन अनावश्यक पैसा खर्च करून शिक्षण घेण्यापेक्षा आपल्या घरापासून जवळ उपलब्ध संधीचा लाभ घेणे गरजेचे आहे.

प्रथम वर्ष पॉलिटेक्निक व इंजिनिअरिंगचे प्रवेश हे केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे (CAP) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून होतात. यामध्ये विद्यार्थ्यांना प्रथम ARC केंद्रामध्ये जाऊन आपला अर्ज भरणे आवश्यक असते. त्यानंतर ऑप्शन फॉर्म भरता येतात. ऑप्शनमध्ये विद्यार्थी आपल्या पसंतीचे विविध संस्थांच्या कोर्सेसचे ऑप्शन घेऊ शकतात. ही प्रक्रिया दोन टप्प्यांत चालते. यामध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शासनाची शिष्यवृत्ती मिळते. त्यामुळे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत भाग घेणे आवश्यक असते.

सध्या प्रथम वर्ष इंजिनिअरिंगचा ऑप्शन फॉर्मचा पहिला टप्पा पार पडला असून, दुसरा टप्पा सुरू होणार आहे. तसेच, प्रथम वर्ष पॉलिटेक्निकची ARC केंद्रामार्फत अर्ज स्वीकृतीची मुदत संपली असून, ऑप्शन फॉर्म भरण्याचा पहिला टप्पा लवकरच चालू होईल. द्वितीय वर्ष पॉलिटेक्निकचेसुद्धा या वर्षीपासून केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांचेही ARC केंद्रामार्फत अर्ज स्वीकृतीची प्रक्रिया लवकरच सुरू होईल.

– प्राचार्य एस. डी. कापसे

सकाळ

नगर, ३० ऑगस्ट २०१३

'संजीवनी'च्या बारा विद्यार्थ्यांची निवड

निघोज, ता. १६ : कुरुंद (ता. पारनेर) येथील संजीवनी प्रतिष्ठान इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्निकच्या तृतीय वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या पाच विद्यार्थ्यांची टाटा मोटर्स (पुणे) या कंपनीमध्ये व कम्प्युटर इंजिनिअरिंगच्या सात विद्यार्थ्यांची ओमस्वॅब आय. टी. सोल्यूशन (पुणे) या कंपनीमध्ये निवड झाली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य सुनील कापसे यांनी ही माहिती दिली. टाटा मोटर्सने विठ्ठलराव विखे पॉलिटेक्निक, लोणी येथे परिसर मुलाखती आयोजित केल्या होत्या. त्यामध्ये ३५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. त्यापैकी ४५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. त्यात संजीवनी महाविद्यालयाच्या तेजल गोडसे, महेंद्र गायकवाड, राहुल कडूस, भगवान नाबगे, अभिजित शिनगारे या विद्यार्थ्यांची निवड झाली, तर ओमस्वॅब आय. टी. सोल्यूशनमध्ये तानाजी आंधळे, मयूर शिंदे, सुषमा भोसले, छाया पठारे, उज्ज्वला शेळके, नम्रता मोरे, सीमा फलके या सात जणांची निवड झाली.

देशदुत नगर, २३ डिसेंबर २०१३

कुरुंदमधील विविध स्पर्धांना चांगला प्रतिसाद

कुरुंद, दि. २२ – कुरुंद येथील संजीवनी प्रतिष्ठान इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी पॉलिटेक्नीकच्यावतीने विविध क्रीडा स्पर्धांना चांगला प्रतिसाद मिळाला असल्याची माहिती संस्थेचे प्राचार्य प्रा. सुनिल कापसे यांनी दिली. दि. १६ डिसेंबर ते २१ डिसेंबर या कालावधीत महाविद्यालयामध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी क्रिकेट, व्हॉलीबॉल, खो खो, कबड्डी, थ्रोबॉल, कुस्ती, कॅरम, चेस, रस्सीखेच आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आलेले आहेत. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांची शारिरीक तंदुरुस्ती महत्त्वाची आहे. स्पर्धांच्या आयोजनामध्ये प्रा. मल्लाव विक्रांत, प्रा. संदीप जाधव, प्रा. गिते, प्रा. कुचेकर [illegible] सहभाग घेतला. स्पर्धा आयोजनामध्ये संस्थेचे अध्यक्ष ॲड. उदय शेळके, प्राचार्य सुनील कापसे यांनी मार्गदर्शन केले.

सकाळ

नगर, १७ मार्च २०१४

ग्रामीण विद्यार्थ्यांतून वैज्ञानिक तयार करा

मोनिका राजळे; कुरुंद येथे संजीवनी महाविद्यालयामध्ये विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन

निघोज, ता. २१ : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये क्षमता असूनही हक्काचे व्यासपीठ न मिळाल्याने कलागुणांना वाव मिळत नाही. ग्रामीण भागातील मुलांमधून शिक्षकांनी चांगले वैज्ञानिक तयार करावेत, असे आवाहन जिल्हा परिषद उपाध्यक्ष मोनिका राजळे यांनी केले.

कुरुंद (ता. पारनेर) येथे संजीवनी महाविद्यालयात विज्ञान व तंत्रज्ञान विभाग व जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित इन्स्पायर ॲवॉर्ड या तीन दिवसांच्या विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी जिल्हा परिषद सदस्य विश्वनाथ कोरडे, प्रतिभा पाचपुते, संजीवनी प्रतिष्ठानच्या संचालिका गीतांजली शेळके, शिक्षणाधिकारी शिवनाथ मंडलिक, उपशिक्षणाधिकारी चौधरी, प्राचार्य एस. डी. कापसे, प्राचार्य एस. ए. शेटे, गटशिक्षणाधिकारी कचरू पठारे, पांडुरंग पांडुळे, शिवाजी वराळ आदी उपस्थित होते.

राजळे म्हणाल्या, "दर वर्षी विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून अनेक बालवैज्ञानिक उदयास येतात. त्यातून त्यांच्या बुद्धीचा अंदाज येतो. यामध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांचे प्रमाण मोठे आहे."

कुरुंद (ता. पारनेर) : संजीवनी महाविद्यालयात विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करताना जिल्हा परिषद उपाध्यक्ष मोनिका राजळे. समवेत गीतांजली शेळके, जिल्हा परिषद सदस्य प्रतिभा पाचपुते, विश्वनाथ कोरडे आदी.

(छायाचित्र : अनिल चौधरी)

मोफत बस सेवा पुरविणार

पारनेर तालुक्यातील विद्यार्थी व विज्ञानप्रेमींसाठी हे प्रदर्शन पर्वणी आहे. प्रदर्शन पाहण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संजीवनी महाविद्यालयातर्फे मोफत बस सेवा पुरविण्यात येत आहे.

सकाळ पुणे, ४ जानेवारी २०१४

मराठी चित्रपटांना सोन्याचे दिवस : नार्वेकर

Dist-Ahmednagar
Prize Distribution

कुरुंद (ता. पारनेर) : संजीवनी प्रतिष्ठान संचालित महाविद्यालयात शुक्रवारी बक्षीस वितरण करताना अभिनेता संजय नार्वेकर. समवेत प्रतिष्ठानाचे अध्यक्ष ॲड. उदय शेळके, प्राचार्य सुनील कापसे, बाबासाहेब कवाद, चंद्रकांत लामखडे आदी.

(छायाचित्र : अनिल चौधरी)

निघोज, ता. ३ : "मराठीत गेल्या तीन-चार वर्षांपासून दर्जेदार चित्रपटांची निर्मिती होत आहे. त्यामुळे मराठी चित्रपटांना सोन्याचे दिवस आले आहेत. मराठी चित्रपटांची लोकप्रियता वाढत असल्याने, एकाच वेळी कितीही चित्रपट प्रदर्शित झाले, तरी मराठी चित्रपटांचा करिष्मा कमी होणार नाही," असा विश्वास अभिनेता संजय नार्वेकर यांनी आज व्यक्त केला.

कुरुंद (ता. पारनेर) येथील संजीवनी प्रतिष्ठान संचालित महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरणप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानाचे अध्यक्ष ॲड. उदय शेळके होते. या वेळी बाबासाहेब कवाद, प्राचार्य सुनील कापसे, प्राचार्य शिवाजी शेटे, माजी सरपंच चंद्रकांत लामखडे, शिवाजी वराळ, बहिरू कळसकर, भिवाजी रसाळ, नारायण बोरुडे आदी उपस्थित होते.

नार्वेकर म्हणाले, "ग्रामीण भागातील मुलांमध्ये मोठ्या प्रमाणात सुप्त गुण असतात. महाविद्यालयात मिळालेल्या हक्काच्या व्यासपीठावर अभिनयकला आत्मसात केल्यास ग्रामीण भागातील मुलेही या क्षेत्रात यशस्वी होतील. तुमच्यासारखाच मी ग्रामीण भागात वाढलो. घरची परिस्थिती जेमतेम असताना जिद्द व चिकाटीच्या जोरावर चित्रपटसृष्टीत काम करतो. कलाकार लोकांचा असल्याने, घराच्या चौकटीत न राहता कलेला वाव द्या. चित्रपटसृष्टीत येणाऱ्याला मेहनत करावीच लागते."

या वेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

देशदुत नगर, १९ ऑगस्ट २०१४

संजीवनी प्रतिष्ठानच्यावतीने स्वातंत्र्यदिन उत्साहात

कुरुंद, दि. १८ – येथील संजीवनी प्रतिष्ठानच्यावतीने स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. डी. कापसे होते. कापसे यांच्या हस्ते यावेळी ध्वजारोहन करण्यात आले. यावेळी नारायण बोरुडे, उद्योजक कैलास कोठवळे, विशाल पठारे, रवी कुरंदळे, विकास जेकटे, जाधव, ग्रंथालय प्रमुख गायकवाड, पत्रकार निलेश शेंडगे आदी उपस्थित होते. बी. एड. महाविद्यालयाचे प्राचार्य शेटे यांनी प्रास्ताविक केले. शितोळे व मांडलिक यांनी सूत्रसंचालन केले.

सकाळ नगर, २० मार्च २०१४

देशाचे भवितव्य तरुणांच्या हाती : भामरे

निघोज, ता. १९ : लोकसभा निवडणुकीत तरुण मतदारांची संख्या जास्त असल्याने आता देशाचे भवितव्यच तरुणांच्या हाती आले आहे. त्यामुळे तरुणांनी मतदान करावेच; शिवाय मतदार जागृतीसाठीही पुढाकार घ्यावा, असे आवाहन पारनेरचे तहसीलदार डॉ. विनोद भामरे यांनी केले. कुरुंद (ता. पारनेर) येथील संजीवनी प्रतिष्ठान संचालित महाविद्यालयात मतदार जागृती कार्यक्रमात ते बोलत होते. प्राचार्य सुनील कापसे, प्रा. सोनाली साळुंके, नारायण बोरुडे, प्रा. बी. व्ही. अनारसे, एस. एन. शिंदे, ए. टी. नांगरे, एन. डी. सुपेकर आदींसह विद्यार्थी उपस्थित होते. भामरे म्हणाले, "देशाचे भवितव्य घडविणारी ही निवडणूक असल्याने तरुण मतदारांमध्ये जागृती करण्यासाठी सकाळ सोशल फाउंडेशनने घेतलेला पुढाकार महत्त्वाचा आहे. या वेळी विद्यार्थ्यांना मतदानाची शपथ देण्यात आली. प्रा. व्ही. ए. मल्लाळ यांनी सूत्रसंचालन केले. एम. डी. कनिच्छे यांनी आभार मानले.